N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** गेवराई **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0266 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/06/2020 01:58 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Date From (दिनांक पासून):** 08/06/2020

**Time Period (कालावधी):** पहर 7

**Date To ( दिनांक पर्यंत):** 08/06/2020

**Time From (वेळेपासून):** 20:30 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 20:30 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 09/06/2020 **Time (वेळ):** 01:44 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 006 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/06/2020 01:44 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** रुची भोजनालय व स्नॅंक्स,ताकडगाव रोड गेवराई

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** कैलास नारायणराव ढोले

**(b) Father's Name (वडील चे नाव) :** नारायणराव ढोले

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1980 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गणेश नगर ,गेवराई,गेवराई,गेवराई,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गणेश नगर ,गेवराई,गेवराई,गेवराई,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9850745222

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दादासाहेब सुखदेव आंधळे | | वडील का नाम : सुखदेव आंधळे | 1. तलाठी सजा खळेगाव,ता गेवराई,गेवराई, गेवराई,बीड,महाराष्ट्र,भारत<br>2. सिध्दीविनायक कॉलनी,कोल्हेर रोड गेवराई,गेवराई,गेवराई,बीड,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि.09/06/2020.मी कैलास नारायणराव ढोले, वय-40 वर्षे, धंदा-शेती, रा.गणेश नगर, गेवराई, ता.गेवराई, जि.बीड मो.क्र. 9850745222दि.08/06/2020 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड येथील पोलीस निरीक्षक श्री.राजकुमार पाडवी यांना माझी एका लोकसेकाविरूध्द माझे कामासाठी लाच मागत असलेबाबत तक्रार असल्याचे सांगुन गेवराई येथे येऊन माझी तक्रार घेणे बाबत विंनती केली. पोनि.पाडवी हे दि.08/06/2020 रोजी गेवराई येथे आल्यानंतर मी माझी तक्रार त्यांचेकडे दिली व त्यानुसार कायदेशीर कारवाई करणेबाबत विनंती केली. माझे तक्रारीचे अनुषंगाने पोनि.पाडवी यांनी त्यांचे सोबत शासकीय वाहनात हजर असलेले दोन शासकिय कर्मचारी यांची ओळख करून दिली व ते सापळा कारवाई दरम्यान पंच म्हणून काम करणार असल्याचे सांगितले.त्यांनतर पोनि.पाडवी यांनी मला माझी तक्रार दोन्ही पंचांना तोंडी सांगण्यास सांगितली असता मी दोन्ही पंचांना माझी तक्रार सांगितली. की, माझे खळेगाव येथील जमीनीचे गट क्र.81 व 810 मधील सातबारा व 8-अ साठी मी आमचे गावचे तलाठी आंधळे यांची भेट घेतली असता तलाठी आंधळे यांनी मला माझे खळेगाव येथील गट क्र.81 व 810 मधील जमीनीचे सातबारा व नमुना 8-अ साठी तुम्हाला 20/-रु प्रति सातबारा व नमुना 8-अ प्रमाणे सर्व सातबारा व नमुना 8-अ च्या प्रतिचे एकुण 240/-रु लागतील असे सांगितले. त्यावर मी तलाठी आंधळे यांना सांगितले की, साहेब माझ्या केवळ 3 सातबारा व तीन 8-अ उतारा आहेत व मला त्याच सातबारा व 8-अ च्या प्रत्येकी दोन अशा प्रमाणित ऑनलाईन प्रति पाहिजे आहेत. त्यासाठी पण एवढे पैसे का. त्यावर तलाठी आंधळे यांनी मला सांगितले की, माझ्याकडे ऑनलाईन सातबारा व 8-अ साठी प्रत्येक प्रतिसाठी 20/- रु प्रमाणेच पैसे द्यावे लागतील व तुमच्या सातबारा व नमुना 8-अ च्या मुळ सातबारा व त्याच्या प्रमाणित प्रति अशा एकुण मिळुन 12 प्रति होतात त्यासाठी तुम्हाला मला 240/-रु द्यावे लागतील तरच तुम्हाला माझ्या सही शिक्क्याच्या सातबारा व नमुना -अ मिळतील.त्यावेळी मला कळुन चुकले की, तलाठी आंधळे हे सातबारा व नमुना 8-अ साठी माझ्याकडुन शासकीय शिवाय जास्तीचे पैसे घेत आहेत. तलाठी आंधळे हे मला माझे सात बारा व 8-अ साठी शासकीय फीस शिवाय मागत असलेले पैसे हे लाचेचेच आहेत. तलाठी आंधळे यांना मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी आपणाकडे तक्रार देत आहे. माझी आंधळे यांचेशी पुर्व दुश्मनी अथवा पैसे देवाण घेवाणीचा किंवा उसनवारिचा व्यवहार नाही. मी आज रोजी तलाठी आंधळे यांना भेटुन माझे कामाविषयी चर्चा करणार आहे व माझे कामासाठी शासकीय नियमाप्रमाणे फीस घेण्याची विनंती करणार आहे. त्यावेळी त्यांनी मला शासकीय फीस शिवाय लाचेची मागणी केल्यास आपण त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी. ही विनंती.त्यानंतर पोनि.पाडवी यांनी माझी तक्रार दोन्ही पंचांना वाचण्यास दिली सदरील तक्रार दोन्ही पंचांनी वाचली मी सांगितलेली तोंडी तक्रार व माझी टंकलिखीत तक्रार सारखीच असल्याची खात्री केली. सदर तक्रारीवर मी, पोनि.पाडवी दोन्ही पंचानी सह्या केल्या.माझ्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने पोनि.पाडवी यांनी शासकिय कर्मचारी श्री.सत्यनारायण तात्याराव खोडवे, वय-34 वर्षे, धंदा-नोकरी, शिपाई, जिल्हा मृद सर्वेक्षण मृद चाचणी कार्यालय, बीड वर्ग-3

यांची पंच क्र.1 म्हणून तर श्री.प्रकाश महादेव जगताप, वय-57 वर्षे, धंदा-नोकरी, वरिष्ठ लिपीक, जिल्हा अधीक्षक, कृषी कार्यालय, बीड वर्ग-3 यांची पंच क्र.2 म्हणून निवड केली. मी दिलेल्या तक्रारीनुसार पोलीस निरीक्षक पाडवी यांनी प्रथम लोकसेवक आंधळे हे मला माझेकामासाठी लाचेची मागणी करतात किंवा कसे? याबाबत पडताळणी करण्याचे ठरविले व मला सापळा कारवाई बाबत माहिती देऊन सापळा कारवाईसाठी वापरले जाणारे व्हाईस रेकर्डर बाबत माहिती दिली. त्यानंतर माझे जवळ व्हाईस रेकर्डर देऊन मला व पंच क्र.1 खोडवे यांचेसोबत तलाठी आंधळे यांची भेट घेणेकामी माझेकडील मारुती स्विफ्ट डिझायर कारने तलाठी आंधळे यांचे गेवराई येथील तलाठी सज्जा कार्यालय येथे पाठविले सदर ठिकाणी तलाठी आंधळे व माझ्यामध्ये माझे कामाविषयी चर्चा झाली व त्यानंतर तलाठी आंधळे यांनी मला माझे मौजे खळेगाव येथील गट क्र.81 व 810 जमीनीचे सातबारा व 8-अ उतारा देण्यासाठी 220/-रु मागितले त्यावर मी त्यांना काही रक्कम कमी करणे बाबत विनंती केली असता आंधळे 220/-रु दिल्याशिवाय सातबारा व 8-अ उतारा मिळणार नाही असे सांगितले. त्यांनतर आम्ही शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी परत आलोत तेथे आल्यानंतर पोनि.पाडवी यांनी माझेकडील व्हाईस रेकर्डर काढुन बंद केले त्यानंतर पोनि.पाडवी, पंच व सापळा पथकाने त्यातील संभाषण ऐकले व लोकसेवक आंधळे यांची माझ्याकडे लाचेची मागणी केल्याचे सिध्द झाले. त्यानुसार सापळा आयोजित करण्यात येणार असल्याचे पोनि.पाडवी यांनी दोन्ही पंच व मला कळविले व केलेल्या सर्व कारवाई बाबत एकत्रित पंचनामा करण्याचे पंचाचे व सापळा पथकाचे संमतीने ठरविले. त्यानंतर कारवाईसाठी थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लम्पचा उपयोग होणार असल्याचे कळवुन त्याबाबत मला व पंचाना माहिती दिली व प्रात्यक्षिक दाखवले. त्यानंतर पोनि.पाडवी यांनी नियोजित कारवाईचे अनुषंगाने सापळा पथक, पंच व मला सुचना दिल्या.त्यानंतर पोनि.पाडवी यांनी माझेकडुन सापळा करवाईसाठी लागणारे 220/-रु ज्यामध्ये 100/-रु दराच्या 2 नोटा व 20/-रु दराची 1 नोट घेऊन त्यांचे नंबर व वर्णन पंच क्र.2 जगताप यांचे करवी नमुद करुन घेतले व त्यास थ्रासिन पावडर लावुन लाचेच्या नोटा माझे पन्टचे पाठीमागील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवल्या व लोकसेवक आंधळे यांनी लाचेची मागणी केल्यास नोटा द्याव्यात व त्यानंतर गळ्यामधील गमजा काढुन डोक्यावर बांधावा असा इशारा नेमुन दिला. त्यानंतर पोनि.पाडवी यांनी व्हाईस रेकर्डर चालु करुन माझेकडे दिले. मी व पंच क्र.1 खोडवे असे लाचमागणी पडताळणी दरम्यान ठरल्याप्रमाणे तलाठी आंधळे यांचे गेवराई येथील तलाठी सजा कार्यालयाकडे रवाना झालो. आमचे पाठोपाठ पोनि.पाडवी सापळा पथकासह आले त्यानंतर माझी पंच क्र.1 यांचे समक्ष लोकसेवक आंधळे यांची त्यांचे गेवराई येथील खळेगाव तलाठी सजा कार्यालय येथे भेट झाली त्यानंतर आमचेत माझे कामासंबधी चर्चा झाली त्यानंतर लोकसेवक आंधळे यांनी मला लाच रक्कम ते बसलेल्या खुर्ची समोरील टेबलवर ठेवण्यास सांगितली असता मी माझे पन्टचे खिशातुन लाचेच्या नोटा काढुन तलाठी आंधळे बसलेल्या खुर्ची समोरील टेबलवर ठेवल्या असता तलाठी आंधळे यांनी सदर नोटा स्विकारुन त्यांनी त्या मोजुन अंगावर परिधान केलेल्या पन्टचे उजवे बाजुचे समोरील खिशात ठेवल्या व काही वेळ आमचे मध्ये कामाविषयी बोलणी झाली व दरम्यानच तलाठी आंधळे हे कार्यालयाचे बाहेर गेले व त्यांचेकडील मोटारसायकल वरुन बाहेर निघुन गेले असता मी लागलीच मला नेमुन दिलेला पुर्वनियोजित इशारा 18.00 वा दरम्यान केला. मी मला नेमुन दिलेला पुर्वनियोजित इशारा केला तो पर्यत तलाठी आंधळे हे त्यांचेकडील मोटार सायकलवरुन कार्यालयातुन निघुन गेले होते. त्यानंतर पोनि.पाडवी यांनी माझ्याजवळ येऊन माझ्याकडील व्हाईस रेकर्डर बंद केले व तलाठी आंधळे हे तुमच्या समोरुन कुठे निघुन गेले असे विचारले असता मी पोनि.पाडवी यांना सांगितले की, तलाठी आंधळे हे घाईत बाहेर आले व त्यांचेकडील मोटारसायकलवर बसुन निघुन गेले त्यावर पोनि.पाडवी व सापळा पथक यांनी मला सोबत घेऊन तलाठी आंधळे यांचा गेवराई शहरामध्ये, त्यांचे घराचे आजु बाजुस शोध घेतला असता तलाठी आंधळे हे ताकडगाव रोडवरील रुची भोजनालय व स्नक्स या ठिकाणी बसलेले दिसले असता पोनि.पाडवी व सापळा पथकाने त्यांना आपला परिचय देत 20.30 वा. दरम्यान ताब्यात घेतले व त्यांना स्विकारलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता तलाठी आंधळे यांनी सांगितले की, सदरील नोटा या त्यांनी अंगावर परिधान केलेल्या पन्टचे उजवे बाजुचे समोरील खिशात ठेवल्या आहेत त्यावर पोनि.पाडवी यांनी पंच क्र.2 जगताप यांना सदरील लाचेच्या नोटा तलाठी आंधळे यांचे खिशातुन काढुन घेण्यास सांगितल्या व त्या नोटा व सापळा पुर्व कारवाई दरम्यान नमुद नोटांचे नंबर एकच असल्याची खात्री करण्यास सांगितली असता पंच क्र.2 जगताप यांनी सदरील नोटा या सापळा पुर्व कारवाई दरम्यान नमुद प्रमाणेच असल्याची खात्री केली. त्यावर पोनि.पाडवी यांनी तलाठी आंधळे यांना त्यांचे नाव, गाव व पत्ता याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे नाव दादासाहेब सुखदेव आंधळे, वय-34 वर्षे, धंदा-नोकरी, तलाठी सजा खळेगाव, ता.गेवराई, जि.बीड रा.सिध्दीविनायक कलनी, कोल्हेर रोड, गेवराई वर्ग-3 असे सांगितले. त्यानंतर आम्ही सर्वजण उर्वरीत कारवाई करणेकामी पोलीस ठाणे गेवराई येथे आलोत सदर ठिकाणी आले नंतर पोलीस निरीक्षक पाडवी यांनी त्यांचे कामकाजासाठी पोलीस ठाणे अंमलदार यांचेकडुन एक संगणक व प्रिंटरची सोय असलेले कक्ष उपलब्ध करुन घेतले व त्यांचे कामकाज सुरु केले. मला घडलेले घटनेची सर्व हकिगत सविस्तर सांगावी व त्याप्रमाणे फिर्याद द्या असे सांगितले. त्यानुसार मी वरील प्रमाणे घडलेल्या घटनेबाबत माझी फिर्यद पोलीस निरीक्षक पाडवी यांचेसमक्ष कथन केली ती माझे सांगणेप्रमाणे टंकलिखीत करण्यासाठी पोलीस निरीक्षक पाडवी यांनी पोशि/गदळे यांना सांगितली त्याप्रमाणे ती टंकलिखीत करण्यात आलेली आहे. तरी माझी दादासाहेब सुखदेव आंधळे, वय-34 वर्षे, धंदा-नोकरी, तलाठी सजा खळेगाव, ता.गेवराई, जि.बीड रा.सिध्दीविनायक कलनी, कोल्हेर रोड, गेवराई यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे. ही फिर्याद दिली ती माझे सांगणेप्रमाणे टंकलिखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Purushottam Vaman Chobe(I (Inspector)) / API **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

पोलीस ठाणे अंमलदार

**Name** (नाव): Purushottam Vaman Chobe

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): API

पो स्टे.गेवराई